नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २४८ Issue - 248 | वार शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ Blow- Friday Date 24 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



## ९८ गुंतवणूक विदेशी

### दावोसमधील करारांबाबत मुख्यमंत्र्यांचा दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) यंदा तब्बल १५ लाख ७० हजार कोटी रुपये गुंतवणुकीसाठी विक्रमी सामंजस्य करार झाले असून त्यातील ९८ टक्के गुंतवणूक ही विदेशी असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केला. यातून १५ लाख ९५ हजार रोजगारनिर्मितीची अपेक्षाही त्यांनी बोलून दाखविली.

आर्थिक परिषदेचा समारोप झाल्यानंतर दावोस येथून दृकश्राव्य माध्यमातून पत्रकार परिषद घेताना फडणवीस यांनी यंदा झालेल्या करारांबाबत सविस्तर माहिती दिली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ५० ते ७५ हजार कोटी रुपये गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार झाले असले तरी प्रत्यक्षात ३५ ते ४० टक्के करारांचीच अंमलबजावणी झाली. मात्र गेल्यावर्षी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या करारांची ९५ टक्के अंमलबजावणी झाल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. गडचिरोलीसह राज्याच्या सर्व विभागांमध्ये आणि कृषीप्रक्रिया, सौर, संरक्षण, विद्युत वाहने आदी अनेक क्षेत्रांमध्ये करार झाले असून समतोल विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. परिषदेत गुंतवणुकीचे ५४ आणि धोरणात्मक भागीदारीचे सात करार झाले. टाटा, रिलायन्ससह अनेक उद्योगसमूह भारतातील असले, तरी त्या आंतरराष्ट्रीय कंपन्या आहेत. त्यांच्याबरोबर अन्य देशांमधील भागीदार असून त्यांच्यासमवेत चर्चेसाठी दावोसमधील परिषदेचे व्यासपीठ आहे. त्यादृष्टीकोनातूनच मॅग्नेटिक महाराष्ट्र, व्हायब्रंट गुजरातसारख्या परिषदांचेही आयोजन केले जाते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**नवी मुंबईत 'इनोव्हेशन सिटी'**

नवी मुंबईत इनोव्हेशन सिटी उभारणार असून ती जगभराशी जोडलेली असेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर पुढील काळात वाढणार असून राज्य सरकारने 'गुगल'शी शासकीय पातळीवर तंत्रज्ञान वापरण्याबाबत करार केला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नोकऱ्यांचे स्वरुपही बदलणार असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने केलेल्या १५ लाख ७० हजार कोटी रुपये गुंतवणुकीच्या करारांपैकी एकतृतीयांशहून अधिक म्हणजे सुमारे सहा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण व पुणे क्षेत्रात होणार आहे. उत्तर महाराष्ट्रात ३०-३५ हजार कोटी, मराठवाड्यात २०-२५ हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार आहे.

फडणवीस यांच्या आधीच्या कार्यकाळापासून म्हणजे २०१५पासून आतापर्यंत (पान २ वर....)

## 'वक्फ विधेयक' आगामी अधिवेशनातच, येत्या दोन दिवसांत अहवालावर शिक्कामोर्तब




नवी दिल्ली : वादग्रस्त वक्फ विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) ५०० पानी अहवाल तयार झाला असून शुक्रवारी व शनिवारी होणाऱ्या समितीच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब केले जाणार आहे. त्यानंतर हा अहवाल विधि मंत्रालयाकडे दिला जाईल व आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यात विधेयक लोकसभाध्यक्षांकडे सादर केले जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

दरम्यान, समितीच्या आजपासून होणाऱ्या अखेरच्या बैठकीत विरोधी सदस्यांकडून मतविभागणीची मागणी होण्याची शक्यता असून ही बैठकही कमालीची वादळी ठरण्याची शक्यता आहे.

लोकसभेत सादर झालेल्या वक्फ विधेयकामध्ये ४४ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. या प्रत्येक दुरुस्तीवर 'जेपीसी'च्या दोन दिवसांच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा केली जाईल. त्यानंतर अहवालाला अंतिम स्वरुप दिले जाईल. राज्या-राज्यांतील वक्फ मंडळांकडे १९५०मध्ये ३५ हजार जमिनी होत्या, गेल्या ७५ वर्षांमध्ये त्यांची संख्या वाढून तब्बल १० लाख झाली आहे. त्यातील अनेक जमिनी वक्फ मंडळाने बळकावल्याचा दावा 'जेपीसी'तील सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी केला आहे. या जमिनींच्या मालकीहक्काबाबत पूर्वलक्ष्यी प्रभावाने फेरआढावा घेतला पाहिजे, अशी मागणी 'जेपीसी'मध्ये करण्यात आली. विधेयकामध्येही या दुरुस्तीचा समावेश (पान २ वर....)

## टोरेस कंपनी फसवणूक प्रकरणात ईडीची मोठी कारवाई

**मुंबई, जयपूरसह १० ठिकाणी छापेमारी**

मुंबई : मुंबईमधील दादर परिसरात टोरेस नावाच्या कंपनीनं कमी कालावधीत पैसे दुप्पट करुन देण्याचं अमिष दाखवत गुंतवणूकदारांची मोठी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला. या प्रकारानंतर महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली. आता या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. आता या फसवणुकीच्या प्रकरणात ईडीने (अंमलबजावणी संचालनालय) एन्ट्री केली आहे. आज ईडीने मोठी कारवाई करत मुंबई आणि जयपूरमधील तब्बल १० ठिकाणी छापेमारी केली आहे.

टोरेस कंपनीने तब्बल १००० कोटींची ही फसवणूक केल्याची माहिती सांगितली जाते. यामध्ये एक लाखांहून अधिक गुंतवणूकदारांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणात कंपनीशी निगडीत असणाऱ्या तिघा जणांना पोलिसांनी अटक केलेलं असून ते कोठडीत आहेत. मुंबई आणि आसपासच्या एक लाखाहून अधिक गुंतवणूकदारांना आकर्षक परतावा देण्याचं आश्वासन या टोरेस कंपनीने दिलं होतं.

दरम्यान, मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या तक्रारीनंतर आता ईडीने या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत या घोटाळ्याचा तपास सुरु करण्यात आला आहे. आज अंमलबजावणी संचालनालयाने (२३ जानेवारी) टोरेस ज्वेलरी फसवणुकीच्या संबंधित मुंबई आणि जयपूरमधील दहा ठिकाणी छापे टाकले आहेत. यासंदर्भातील वृत्त इकोनॉमिक्स टाईम्सने दिलं आहे.

कंपनीने चार योजना आणल्या होत्या. सोन्यामध्ये गुंतवणूक करा आणि आठवड्याला दोन टक्के व्याज घ्या, चांदीत गुंतवणूक केल्यास तीन टक्के, मोझानाईट खड्यात गुंतवणूक (पान २ वर..)

## बेकायदा स्थलांतराला विरोधच : एस. जयशंकर



वॉशिंग्टन : 'कुठलेही कागदपत्रे नसलेल्या आणि अमेरिकेत राहत असलेल्या भारतीयांना भारतात वैध मार्गाने परत आणण्यासाठी भारताचे दरवाजे कायमच खुले आहेत,' असे वक्तव्य परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पत्रकारांशी बोलताना केले. 'अमेरिकेतील नेमक्या किती भारतीयांना परत आणता येईल, यासंबंधीची प्रक्रिया सुरू असून, अंतिम आकडा अद्याप निश्चित झालेला नाही,' असे जयशंकर म्हणाले.

अमेरिकेत जवळपास पावणेदोन लाख भारतीय कागदपत्रांविना राहत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यावर जयशंकर यांनी पत्रकार परिषदेत विविध प्रश्नांना उत्तरे दिली. अमेरिकेत बेकायदा स्थलांतरितांचा मुद्दा गाजत आहे. या पार्श्वभूमीवर जयशंकर म्हणाले, 'कायद्याने मुक्तसंचार असावा, या भूमिकेला सरकार म्हणून आमचा पाठिंबा आहे. जागतिक स्तरावर भारतीय कौशल्य आणि बुद्धिमत्तेला अधिकाधिक संधी मिळावी, अशी आमची इच्छा आहे. त्याच वेळी बेकायदा पद्धतीने कुणी कुठे जात असेल, तर बेकायदा स्थलांतराला आमचा विरोध आहे. कुठे बेकायदा घडले, तर त्याच्या बरोबरीने आणखी बेकायदा कृत्यांचा जन्म होतो. असे होणे अपेक्षित नाही'

जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांची भेट घेतली. त्यांच्याबरोबर बांगलादेशमधील सद्यास्थितीवर चर्चा झाल्याची माहिती परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी दिली. रुबिओ यांच्याबरोबरच अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माइक वॉल्ट्स यांचीही जयशंकर यांनी भेट घेतली. जयशंकर म्हणाले, 'बांगलादेशमधील परिस्थितीवर आमची चर्चा झाली. त्यावर अधिक काही बोलणे योग्य होईल, असे वाटत नाही.' अमेरिकेतील भारतीय वकिलातींवर झालेल्या हल्ल्यांचा मुद्दा या वेळी उपस्थित केला नाही, असे परराष्ट्रमंत्री जयशंकर म्हणाले.

## थोडक्यात...

### टिपरच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी ; जुना बोरामणी नाका येथील घटना

सोलापूर : दुचाकीवरुन (एम.एच.१३.बीडब्ल्यू ७४२५) घराकडे निघालेल्या दुचाकीस्वाराला जुना बोरामणी नाका परिसरात टिपरने (एम.एच.२५.एफ.११११) जोरात धडक दिली.त्यात भारत अशोक विरस्वामी (रा.जुना विडी घरकूल,सोलापूर) हा दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून,त्यास उपचारासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले.या अपघातात त्यांचा उजवा हात तुटला असून,जेलरोड पोलिस टिपर चालकाचा शोध घेत आहेत.

## जळगाव रेल्वे दुर्घटनेच्या चौकशीसाठी वरिष्ठांचे पथक



नवी दिल्ली : जळगावमधील बुधवारच्या लखनऊ-मुंबई पुष्पक एक्स्प्रेस दुर्घटनेचा तपास करण्यासाठी मध्य रेल्वेच्या पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक नेमण्यात आल्याची माहिती रेल्वे बोर्डाने गुरुवारी दिली. या अपघातात १३ जणांचा मृत्यू, तर १० प्रवासी गंभीर जखमी झाल्याचेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

तपास पथकात प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी (पीसीएसओ), प्रधान मुख्य सुरक्षा आयुक्त (पीसीएससी), प्रधान मुख्य विद्युत अभियंता (पीसीईई), प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता (पीसीएमई) आणि प्रधान मुख्य व्यावसायिक व्यवस्थापक (पीसीसीएम) यांचा समावेश आहे. या पथकाने अपघाताचा तपास सुरू केला आहे. त्यात प्रधान मुख्य सुरक्षा अधिकाऱ्याची 'समन्वयक' म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे रेल्वे बोर्डाच्या माहिती आणि प्रचार विभागाचे कार्यकारी संचालक दिलीप कुमार यांनी सांगितले. घटनेचा सर्व अंगांनी तपास करून शक्य तितक्या लवकर अहवाल सादर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे कुमार पुढे म्हणाले.

बुधवारी सायंकाळी आग लागल्याच्या अफवेमुळे लखनऊ-मुंबई पुष्पक एक्स्प्रेसमधील प्रवाशांनी रेल्वेतून रुळावर उड्या घेतल्या. याच वेळी लगतच्या रेल्वे मार्गावरून वेगाने येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने त्यांना धडक दिली. यात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला. प्रवाशांनी अलार्म चेन ओढून पुष्पक एक्स्प्रेसमधून खाली उतरण्याचे कारण शोधण्यासाठी रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) आणि सरकारी रेल्वे पोलिसांनी (जीआरपी) बुधवारी सायंकाळीच प्राथमिक तपास सुरू केल्याची माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्निल निला यांनी 'पीटीआय'ला दिली. आता हा तपास पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाकडे सोपवण्यात आला आहे.

आगीच्या अफवेमुळे पुष्पक एक्स्प्रेसमधील प्रवाशांमध्ये घबराट पसरली. अलार्म चेन खेचल्यानंतर काही प्रवाशांनी धावत्या गाडीतून रेल्वे रुळावर उड्या घेतल्या. तेव्हा वेगाने येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने त्यांच्यापैकी अनेकांना चिरडले. दरम्यान, रेल्वेच्या कोणत्याही बोगीतून आगीच्या ठिणग्या किंवा धूर आला नाही, असे रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

**मुख्यमंत्री महोदयांचा शंभर दिवसात उद्दिष्टपुर्ती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे**

**पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून शासकीय विभागांचा आढावा**

## प्रशासनाने सर्वसामान्यांची कामे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्वरित मार्गी लावावीत : पालकमंत्री जयकुमार गोरे

सोलपुर, दिनांक २३(जिमका):- शासनाने सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना सुरू केलेल्या असून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेची आहे. त्यामुळे या प्रशासकीय यंत्रणेने सर्वसामान्यांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा तसेच यंत्रणेकडे येणारी कामे त्वरित मार्गी लावावीत, असे आवाहन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

### महापालिकेच्या पाणीपुरवठा योजनेसाठी सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जाणार

नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय सर्व विभागांच्या आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार सर्वश्री राम सातपुते, रवींद्र राऊत, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार,





उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसात सात सुत्री कार्यक्रमाची उद्दिष्टपूर्तता करण्याचे निर्देश दिलेले आहेत त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व सर्व प्रशासकीय यंत्रणेने आपली जबाबदारी ओळखून कामे पूर्ण करावीत. या अंतर्गत सर्वसामान्यांना विविध सोयी सुविधा देण्याबरोबरच कार्यालयाची स्वच्छता करावी. तसेच ही स्वच्छता मोहीम राबवत असताना सर्वसामान्य नागरिकांना चांगली वागणूक देऊन त्यांची कामे त्वरित मार्गी लावण्याच्या दृष्टीने अधिकारी- कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या मनाची स्वच्छता ही केली पाहिजे, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना त्या त्या कार्यालयातील अधिकारी कर्मचारी कशा पद्धतीची वागणूक देतात याची माहिती मिळण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयात व्हाईस सीसीटीव्ही कॅमेरे यंत्रणा बसवावी, त्यासाठी आवश्यक असलेला निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येईल. तसेच कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची कशा पद्धतीने वागावे याबाबत सर्व अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण द्यावे. प्रत्येक कार्यालयात स्वच्छता कशा पद्धतीने ठेवली जात आहे तसेच सर्वसामान्य नागरिकांची त्या कार्यालयांचा व्यवहार कशा पद्धतीचा आहे याची माहिती आपण त्या त्या शासकीय कार्यालयात पुढील काळात अचानक भेट देऊन माहिती घेणार असल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले.

केंद्र व राज्य शासन हे दूरदृष्टी असलेले शासन असून सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व प्रकारचे सहकार्य मिळणार आहे. पुढील काळात सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उद्योग व्यवसाय वाढतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत तसेच येथे येणाऱ्या गुंतवणूकदारांना गुंतवणूक करताना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही (पान २ वर...)

## संपादकीय....

### वरिष्ठ पथकाकडे तपास

जळगावमधील बुधवारच्या लखनऊ-मुंबई पुष्पक एक्स्प्रेस दुर्घटनेचा तपास करण्यासाठी मध्य रेल्वेच्या पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक नेमण्यात आल्याची माहिती रेल्वे बोर्डाने गुरुवारी दिली. या अपघातात १३ जणांचा मृत्यू, तर १० प्रवासी गंभीर जखमी झाल्याचेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले. तपास पथकात प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी (पीसीएसओ), प्रधान मुख्य सुरक्षा आयुक्त (पीसीएससी), प्रधान मुख्य विद्युत अभियंता (पीसीईई), प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता (पीसीएमई) आणि प्रधान मुख्य व्यावसायिक व्यवस्थापक (पीसीसीएम) यांचा समावेश आहे. या पथकाने अपघाताचा तपास सुरू केला आहे. त्यात प्रधान मुख्य सुरक्षा अधिकाऱ्याची 'समन्वयक' म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे रेल्वे बोर्डाच्या माहिती आणि प्रचार विभागाचे कार्यकारी संचालक दिलीप कुमार यांनी सांगितले. घटनेचा सर्व अंगांनी तपास करून शक्य तितक्या लवकर अहवाल सादर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे कुमार पुढे म्हणाले. बुधवारी सायंकाळी आग लागल्याच्या अफवेमुळे लखनऊ-मुंबई पुष्पक एक्स्प्रेसमधील प्रवाशांनी रेल्वेतून रुळावर उड्या घेतल्या. याच वेळी लगतच्या रेल्वे मार्गावरून वेगाने येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने त्यांना धडक दिली. यात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला. प्रवाशांनी अलार्म चेन ओढून पुष्पक एक्स्प्रेसमधून खाली उतरण्याचे कारण शोधण्यासाठी रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) आणि सरकारी रेल्वे पोलिसांनी (जीआरपी) बुधवारी सायंकाळीच प्राथमिक तपास सुरू केल्याची माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्निल निला यांनी 'पीटीआय'ला दिली. आता हा तपास पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाकडे सोपवण्यात आला आहे.

# महाराष्ट्रात १ जानेवारी २०२५ पासून ५ वाघांचा नैसर्गिक तर ३ वाघांचा अपघाती मृत्यू

## वन विभागाची माहिती; ३ वाघांच्या शिकारीची चौकशी सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/मुंबई: महाराष्ट्रात १ जानेवारी २०२५ पासून ५ वाघांचा नैसर्गिक मृत्यू झाला असून ३ वाघांचा अपघातात मृत्यू झाला आहे. तर ३ वाघांची शिकार करण्यात आली असून याबाबत चौकशी सुरु असल्याचे वन विभागाने कळविले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी व वनपरिक्षेत्रात २ जानेवारी २०२५ रोजी वाघांच्या आपसातील हल्ल्यात मृत्यू झाला. भंडारा जिल्ह्यातील तुमसर वनपरिक्षेत्रात ६ जानेवारी रोजी एका वाघिणीचा विजेच्या धक्क्यामुळे मृत्यू झाला. या वाघाच्या शिकारीत सहभागी असलेल्या तीन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. पांढरकवडा वनविभाग अंतर्गत वणी येथे ७ जानेवारी रोजी एका वाघिणीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला असून या वाघिणीचे दात, पंजे गायब असल्याने या प्रकरणाचा तपास सुरू आहे. नागपूरच्या देवलापार वनपरिक्षेत्रात ८ जानेवारी रोजी एका बछड्याचा विजेचा धक्का देऊन मृत्यू झाला असल्याचे आढळून आल्याने या प्रकरणाचा तपास सुरू आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र वनक्षेत्रातील मूल वनपरिक्षेत्रात ९ जानेवारी रोजी एका बछड्याचा नैसर्गिक मृत्यू झाला. गोंदिया येथील दासगाव वनपरिक्षेत्रात दिनांक १४ जानेवारी रोजी आजारपणामुळे एका वाघाचा मृत्यू झाला असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

नागपूर येथील देवलापार वनपरिक्षेत्रात १५ जानेवारी रोजी एका बछड्याचा नैसर्गिक मृत्यू झाला.

ब्रह्मपुरी वनक्षेत्रातील सिंदेवाही वनपरिक्षेत्रात १९ जानेवारी २०२५ रोजी रेल्वेला धडकून अपघात झाला आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प शिवणी वनपरिक्षेत्रातील एका बछड्याचा दिनांक २० जानेवारी रोजी नैसर्गिक मृत्यू झाला तर २१ जानेवारी रोजी पेंच व्याघ्र प्रकल्प नागलवाडी वनपरिक्षेत्रात एका वाघाचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. तसेच वर्धा वनविभागातील समुद्रपूर येथे एका बछड्यांचा रस्ते अपघातात २२ जानेवारी २०२५ रोजी मृत्यू झाला असून शव विच्छेदन अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याचे वन विभागाने कळविले आहे.

## नारायण शेठ वाजे यांना सहकार रत्न पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



सिन्नर /प्रतिनिधी : डुबेरे येथील श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन व राज्य पतसंस्था फडरेशनचे कार्याध्यक्ष नारायण शेठ वाजे यांना श्रीराम सेवक सेवा समिती यांच्या वतीने सहकार रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .

श्रीक्षेत्र आयोध्या या ठिकाणी साकारण्यात आलेल्या विश्व प्रसिद्ध प्रभू श्रीराम मंदिर वर्धापन दिन महोत्सवानिमित्ताने पाथर्डी फाटा नाशिक येथील श्रीराम सेवा समितीच्या वतीने आयोजित भव्य दिव्य

श्रीराम कथा या मंगलमय सोहळ्याचे आयोजन केले आहे.या मंगलमय सोहळ्यामध्ये वाजे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला .वाजे यांचे सहकार क्षेत्रातील महाराष्ट्रभर उत्कृष्ट कार्य तसेच सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, राजकीय, अध्यात्मिक, दानधर्म, वारकरी संप्रदाय आदी क्षेत्रामध्ये अलौकिक व अनमोल योगदान लक्षात घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे . कार्यक्रमाचे आयोजक व माजी नगरसेवक सुदाम भाऊ कोंबडे निवृत्तीनाथ महाराज समाधी संस्था श्री क्षेत्र त्रंबकेश्वर या संस्थेचे विश्वस्त ह भ प राहुल महाराज साळुंके ,श्रीराम सेवक सेवा समितीचे अध्यक्ष संजय बोराडे, कार्याध्यक्ष दादा मेढे पाटील ,जेष्ठ नेते प्रकाशभाऊ वाजे आदींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल राज्याचे कृषिमंत्री डव्होकेट माणिकराव कोकाटे ,खासदार राजाभाऊ वाजे ,सिन्नर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष कृष्णाजी भगत, श्रीमंत पतसंस्थेचे व्हा.चेअरमन अरुणशेठ वारुंगसे, डुबेरे जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक राम दास वाजे तसेच सर्व संचालक आदींसह विविध विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे .

## संजय गांधी निराधार श्रावण बाळ प्रकरणे लागणार मार्गी तहसिलदार अजय दिवटे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**
**राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी**




सिंदखेडराजा अनिल दराडे सिंदखेडराजा तालुक्यातील सर्व संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजना लागणार मार्गी बर्याच दिवसांपासून हे काम रखडले आहे हे काम एक दोन दिवसात मार्गी लावणार असे तहसिलदार साहेब यांनी दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क शी बोलताना सांगितले ते असे म्हणाले की दलाला पासुन दुर राहा व डायरेक्ट माझ्या सी किंवा नायब तहसीलदार यांच्या कडे सम्पर्क करण्याचे आव्हान त्यांनी केले व आता येथुन पुढे दर बुधवारी मिटिग घेउन प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी व माझे सहकारी परेतनशिल राहु व सर्व जनतेला मी आसे आव्हान करतो कि थेट तहसिलदार व नायब तहसीलदार यांच्या सी संपर्क साधावा व गोरगरिब यांची होणारी लुट थांबवण्यासाठी मी सैदव जनतेची सेवा करण्यासाठी कटिबद्ध आहे येथुन पुढे कोणावरही अन्य होऊ देणार नाही व एका महिन्यात प्रत्येक बुधवारी मिटिग घेउन प्रश्न मार्गी लागतील असे त्यांनी सांगितले

## प्रशासनाने सर्वसामान्यांची कामे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्वरित मार्गी लावावीत : पालकमंत्री जयकुमार गोरे

(पान १ वरून...) यासाठी प्रशासनाने ही योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच प्रशासकीय यंत्रणेने लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्यातून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवावेत. तसेच लोकप्रतिनिधी घेऊन आलेले प्रश्न, कामे विहित पद्धतीने पूर्ण करावीत. लोकप्रतिनिधी यांना सन्मान द्यावा असेही पालकमंत्री गोरे यांनी सुचित केले.

सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारी सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना ही खूप मोठी योजना असून या योजनेचे ९०% पेक्षा अधिक काम झालेले दिसून येत आहे. तरी पाणी पंपिंग करण्यासाठी लागणारी वीज ही सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करू. हा सौर ऊर्जा प्रकल्प झाल्यास महापालिकेचे दरमहा लाखो रुपयांची वीज बचत होऊन हा निधी विकास कामांना वापरणे शक्य होणार असल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महापालिका व अन्य संबंधित विभागाचे विकास कामासाठी शासन स्तरावर प्रलंबित असलेले सर्व प्रश्नांची सोडवणूक सर्वांच्या सहकार्यातून लवकरात लवकर करण्यास आपले प्राधान्य राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सादरीकरणाद्वारे सोलापूर जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती सांगितली. तसेच जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेले विविध योजना प्रकल्प याची माहिती दिली. त्याप्रमाणेच मुख्यमंत्री महोदयांचा शंभर दिवसात उद्दिष्ट पूर्तता कार्यक्रम याची सविस्तर माहिती दिली. सोलापूर विमानतळ विषय सविस्तर माहिती देऊन माहे मार्च २०२५ मध्ये येथून प्रवासी विमान वाहतूक सुरू होऊ शकते असे त्यांनी सांगितले. महापालिका आयुक्त श्रीमती तेली यांनी सोलापूर महापालिकेची सविस्तर माहिती दिली. तर मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती बैठकीत दिली.

**शहरातील राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांना पालकमंत्री यांनी केले वंदन**

राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे पालकमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले असताना सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, धर्मवीर संभाजी महाराज पुतळा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा, चार हुतात्मा पुतळा येथे जाऊन त्यांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त श्रावण बाळ वृद्धाश्रम मध्ये धान्याचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/संजय चव्हाण : शिरोळ तालुक्यातील अकिवाट येथे गुरुदत्त साखर कारखान्यासमोर श्रावण बाळ वृद्धाश्रम येथे आज गुरुवार दिनांक २३ १ २०२५ रोजी सकाळी साडेअकरा वाजता हिंदुहृदय सम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त फोटो पूजन करून शिवसेना शिरोळ तालुका यांच्या वतीने श्रावण बाळ वृद्धाश्रमत सर्वसामान्य निराधार दिन दुबळे वृद्धांना चांगल्या मात्रेचे धान्य वाटप करण्यात आले यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख उदय झुटाळ तालुका समन्वयक हारिभाऊ पाटील, तालुका संघटक संभाजी गोते विक्रम घोरपडे, विभाग प्रमुख, महादेव सूर्यवंशी विलास कांबळे मागासवर्गीय शेल शिरदवाड आणि वृद्धाश्रम चे अध्यक्ष सुरेश सासूने संचालिका शोभाताई पांणदारे वृद्धाश्रम मधील कर्मचारी आणि अनाथ वृद्ध इत्यादी उपस्थित होते हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## 'वक्फ विधेयक' आगामी अधिवेशनातच, येत्या दोन दिवसांत अहवालावर शिक्कामोर्तब

(पान १ वरून..) करण्यात आला आहे. वक्फच्या जमिनी वा मशिदी ताब्यात घेतल्या जाणार नाहीत. मात्र, वक्फ दुरुस्तीचा कायदा लागू झाल्यानंतर सहा महिन्यांमध्ये वक्फ मंडळाच्या सर्व जमिनींची सरकारकडे नोदणी करणे अनिवार्य असेल. 'जेपीसी'च्या अहवालामध्येही हा मुद्दा अधोरेखित केला जाण्याची शक्यता आहे. 'जेपीसी'च्या आतापर्यंत झालेल्या ३४ बैठकांपैकी बहुतांश वादळी ठरल्या होत्या. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांची बाटली फोडण्यापर्यंत मजल गेली होती. काँग्रेस, द्रमुक, शिवसेना-ठाकरे गट आदी विरोधी सदस्यांनी विधेयकातील दुरुस्त्यांना कडाडून विरोध केला होता. वक्फच्या जमिनींची मालकी ठरवण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिला जाणार आहे. राज्यातील वक्फ मंडळावर दोन बिगरमुस्लिम सदस्यांची नियुक्ती केली जाईल. या दोन्ही तरतुदींवर विरोधकांनी आक्षेप आहे. आत्तापर्यंत 'जेपीसी'ने मुस्लिमांतील विविध पंथ, समूह, धार्मिक संस्था-संघटना, विधि तज्ज्ञ, अभ्यासक यांचे मुद्दे विचारात घेतले आहेत. एक कोटींहून अधिक हरकती व सूचना आल्याचा दावाही सूत्रांनी केला. जेपीसीच्या सदस्यांनी २०हून अधिक राज्यांतील वक्फ मंडळांशी चर्चा केली. मुंबई, अहमदाबाद, चेन्नई, हैदराबाद, बेंगळुरू, हैदराबाद, गुवाहाटी, भुवनेश्वर, कोलकाता, पाटणा व लखनऊ या शहरांना भेटी दिल्या. 'एनडीए'तील घटक पक्ष जनता दल (सं), शिवसेना-शिंदे गट यांनी विधेयकाला पाठिंबा दिला असला तरी 'तेलुगु देसम'ने विधेयकावर जेपीसीमध्ये चर्चा करण्याची मागणी केली होती. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात 'जेपीसी'ला सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र वर्षअखेरीस होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारला विधेयक संसदेत मंजूर करून घ्यायचे असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अहवाल संसदेत मांडला जाणार आहे. त्यासाठी २७ जानेवारीपर्यंत अंतिम अहवाल तयार करण्याची घाई केली जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार व 'जेपीसी'चे सदस्य नासीर हुसैन, 'द्रमुक'चे लोकसभेतील खासदार ए. राजा यांनी गुरुवारी होणारी बैठक पुढे ढकलण्याची लेखी मागणी 'जेपीसी'चे अध्यक्ष जगदम्बिका पाल यांच्याकडे केली होती.

## ९८ गुंतवणूक विदेशी

(पान १ वरून..) दावोसमध्ये झालेले सामंजस्य करार आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी होऊन सुरु झालेले उद्योग याचा संपूर्ण तपशील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) संकेतस्थळावर काही दिवसांत उपलब्ध करुन देण्याचा सरकार प्रयत्न करणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. यंदा केलेल्या करारांची अंमलबजावणी केली जाईल व टीकाकारांना संधी दिली जाणार नाही, असे ते म्हणाला.

यंदा झालेली ९८ टक्के गुंतवणूक विदेशी आहे. या करारांची प्रत्यक्षात अंमलबजावणी होईल व उद्योग सुरू होतील. त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. विरोधकांना गुंतवणूक आणणे जमले नसल्याने ते असुयेपोटी टीका करीत आहेत. मात्र जनता सरकारच्या कामामुळे समाधानी आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## टोरेस कंपनी फसवणूक प्रकरणात ईडीची मोठी कारवाई

(पान १ वरून..) केल्यास चार टक्के, पण केवळ मोझानाईट खड्यात गुंतवणूक केली तर पाच ते सहा टक्के व्याज अशा त्या योजना होत्या. रोख रकमेद्वारे गुंतवणूक केल्यास अधिक परतावा (११ ते १४ टक्के) देण्याचे आमीष दाखविले जात होते. जर गुंतवणूकदारांनी आणखी गुंतवणूक आणल्यास त्यांना सरसकट २० टक्के व्याजाचे आमिष दाखविण्यात आले. यासाठी कंपनीमार्फत परिसंवादाचेही आयोजन केले जात होते. आम्हाला सोने एकदम स्वस्तात मिळते. त्यावर ३०० टक्के नफा मिळतो. त्यामुळेच आम्ही इतके व्याज देऊ शकतो, असेही सांगितले जात होते.

**वसतिगृहांना सामाजिक न्यायमंत्र्यांनी दिली भेट, विद्यार्थ्यांशी साधला संवाद**

**सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे प्रतिपादन**

# शासकीय वसतिगृहातील सोयी-सुविधा सुधारण्यावर भर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/मुंबई : सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी- सुविधांमध्ये सुधारणा करुन विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पध्दतीने शिक्षण घेता यावे यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत विशेष प्रयत्न केले जातील, असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

मुंबईतील सामाजिक न्याय विभागाअंतर्गत सुरु असलेल्या संत मीराबाई मुलींचे शासकीय वसतिगृह वरळी ११६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह वरळी ११६, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह वरळी ११८ या वसतिगृहांना सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदिप कांबळे, समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, सहाय्यक आयुक्त मुंबई शहर, उज्वला सपकाळे, सहाय्यक आयुक्त मुंबई उपनगर प्रसाद खैरनार उपस्थित होते. वरळी येथील शासकीय वसतिगृहाच्या इमारतीचा पुर्नविकास करताना विद्यार्थ्यांसाठी कमीत कमी २०० ते २५० चौ.फूट इतकी जागा प्रत्येक खोलीत उपलब्ध करुन देण्यात येईल, जेणेकरुन विद्यार्थी पुरेशा जागेत राहू शकतील. तसेच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारच्या कॉट ,गादया व कपाटे, अद्ययावत कॉम्प्युटर, स्पर्धा परिक्षेची अद्ययावत पुस्तके उपलब्ध करुन देण्यात येतील. विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या निर्वाह भत्त्यामध्ये वाढ करण्यात येईल. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा यासाठी सुद्धा सामाजिक न्याय विभागातर्फे विशेष प्रयत्न केले जातील असेही श्री. शिरसाट यांनी सांगितले.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी श्री. शिरसाट यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून श्री.शिरसाट यांनी त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सामाजिक न्याय मंत्र्यांच्या वसतिगृहातील अचानक भेटीमुळे विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज


## थोडक्यात...




### अज्ञात चोराने मोबाईलसह दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : मोबाईल व दुचाकी क्रमांक एमएच.१३.ईएम.०७८३ व मोबाईल फिर्यादी यांच्या सहमतीशिवाय चोरून नेल्याची घटना २० ते २१ जानेवारी दरम्यान अनिल लॉज मुरारजी पेठ येथे घडली. याप्रकरणी अकलाक अ.वहाब काझी (वय-३८,रा.आयशा नगर,शांतीनगर,नई जिंदगी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहेत.

# सोलापूर जिल्ह्यात वाळू माफियांचे राज्य चालू देणार नाही : पालकमंत्री जयकुमार गोरे

## विठुरायांच्या नगरीत लवकरच कायापालट होणार; आराखडा अंतिम टप्प्यात : मंत्री जयकुमार गोरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठूरायांच्या नगरीला लवकरच कायापालट होणार असून त्याचा आराखडा अंतिम टप्प्यात आहे तर सोलापूर जिल्ह्यातील कोणताही वाळूमाफियाचे राज्य चालू देणार नाही यावर योग्य ती कारवाई केली जाणार असून राज्याचे मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वात काम करत असताना वाळू माफियांचे राज्य संपून जाईल हे चित्र आपल्याला पाहायला मिळेल अशी प्रतिक्रिया सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विठुरायाच्या दर्शनानंतर माध्यमांसमोर बोलताना व्यक्त केले.

रंजीतच्या नाईक निंबाळकर माजी आमदार प्रशांत परिचारक माजी आमदार राम सातपुते, भाजपा जिल्हाध्यक्ष चेतन केदार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की पंढरपूरच्या विकासाची गृहमंत्री ची स्वप्न आहे लवकरच आपल्याला चांगल्या पद्धतीचा विकास या ठिकाणी होताना दिसणार आहे श्री क्षेत्र पंढरपूर येणाऱ्या लाखो भाविक व नागरिकांची चांगल्या प्रकारे सोयी सुविधा व्हावी या ठिकाणी स्वच्छता दिसावी तसेच या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येकाची स्वागत व्हावी यासाठी मुख्यमंत्री महोदय लवकरच निर्णय घेणार असून येणाऱ्या काही दिवसातच याची प्रचिती होईल असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

लवकर एक महत्त्वाची बैठक होणार आहे यावेळी बेकायदेशीर सुरू असलेल्या कामावर आळा घालण्यासाठी योग्य ती कारवाई करण्यासाठी सूचना देण्यात येतील त्याचबरोबर सोलापूर जिल्ह्यातील कोणतीही बेकायदेशीर कामे चालू दिली जाणार नाही कायदा व सुव्यवस्था राखली जाईल सर्वसामान्य जनतेला अन्याय मिळेल या ठिकाणच्या कोणत्याही अधिकारी व जनतेला त्रास होणार नाही त्यामुळे माफिया राज्य संपून जाईल व राज्याचे मुख्यमंत्री जनतेला अपेक्षित असलेली कामे या ठिकाणी होतील असा विश्वास सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शेवटी व्यक्त केली.

# खासदार प्रणिती शिंदे यांनी दिली डॉक्टर शितल शहा यांच्या रुग्णालयास भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार कमिटी शिंदे यांनी पंढरपूर येथे बालकाचे देवदूत अशी ओळख असलेल्या डॉक्टर शितल शाळेच्या नवजीवन ब बाल रुग्णालयात भेट दिली.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी डॉक्टर शीतलशाहींच्या बालकांचे विविध आजार, त्यांची कारणे, भारतात तसेच महाराष्ट्र राज्यात होणारे आजार व त्यांचे लहान मुलावर होणारे दुष्परिणाम, हे रोग होऊ नये यासाठी आवश्यक काळजी यावर चर्चा बालकांसाठी सुशील जे असे आय. सी यु, इतर विशेष उपचार पद्धती प्रॅक्टिस मधील विविध रोचक घटना अनुभव.

भारतीय रुग्नेसेवेच्या बदलते स्वरूप, आव्हाने उपचार पद्धती मधील बदल यावर सखोल चर्चा केली खा. शिंदे यांनी आपल्या मतदारसंघात आरोग्य विषयी विविध योजना अत्याधुनिक तंत्रज्ञान आणणार असल्याचे संकेत दिले.

यावेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची पंढरपूर येथील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉक्टर शितल शहा यांनी सुरुवातीला प्रणिती शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : राज्याचे ग्राम विकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. तत्पुर्वी पालकमंत्री गोरे यांनी पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाच्या कामांबाबतची माहिती घेतली.

याप्रसंगी आमदार समाधान आवताडे, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राम सातपुते, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे, विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा नवीन शैक्षणिक धोरणाचा हेतू : डॉ. दातीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांना आनंदायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात नवीन शैक्षणिक धोरणाचा मोठा वाटा असेल; शिवाय विद्यार्थ्यांचा ज्ञानात्मक, सामाजिक-भावनिक विकास होण्यासही त्याची मदत. होणार आहे. थोडक्यात सांगायचे तर विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासाच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण महत्वाची भूमिका बजावणार आहे. असे प्रतिपादन के. के. वाघ महाविद्यालयाचे सल्लागार डॉ. आर. के दातीर यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित, के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक महाविद्यालय काकासाहेबनगर महाविद्यालयात प्रवेश प्रक्रीयेअंतर्गत नवीन शैक्षणिक धोरणाची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी म्हणून शाळा-विद्यालयाची महाविद्यालयाला भेट, कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तेव्हा प्रमुख अतिथी म्हणून डॉ. आर. के. दातीर बोलत होते.

व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. अरुण ठोके यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या बाबी तसेच महाविद्यालयाच्या भौतिक सुविधा यांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली.

या कार्यक्रमाला वनसगाव व छत्रपती कनिष्ठ विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडांगण इत्यादी सुविधा दाखविण्यात आल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवेश समिती प्रमुख प्रा. नीलेश आहेर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना ताकाटे, तर आभार प्रा. प्रकाश कडाळे यांनी मानले.

कार्यक्रमास संगणक विज्ञान प्रमुख प्रा. शीतल जगताप, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. वैशाली शिंदे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. मुक्ता मोरे, कला विभाग प्रमुख डॉ. त्र्यंबक बाबळे आदी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

# निफाड सायकलीस्टच्या वतीने न्यायाधीश रानडे यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड /प्रतिनिधी : न्या. महादेव गोविंद रानडे पुण्यतिथि व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत निफाड ते परसुल अशी ५० किमी सायकलिंग ३ तासात पुर्ण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सकाळी ६.०० वाजता ज्येष्ठ सायकलीस्ट डॉ राहुल ताथेड, उपाध्यक्ष अशोक कोल्हे यांनी जनसेवा हॉस्पिटल कॉर्नर, ऊगाव रोड येथून झेंडा दाखवुन शुभेच्छा दिल्या. यात राजाभाऊ गवळे, दिपक बोरसे, अथर्व नकाते, पांडुरंग कडवे, शरयू कडवे, डॉ सुदर्शन चांडक, कु जोष्णा चांडक, प्रसन्न कडवे, कैलास भागवत, प्रविण तनपुरे यांनी सहभाग नोंदविला. राईड यशस्वी पुर्ण केले बद्दल या वेळी डॉ सीमा डेर्ले यांचे हस्ते सर्व सायकलीस्ट यांना मेडल प्रदान करण्यात आले.

**स्वेरीत सातवा'मासिक योग दिन'साजरा**

**आपल्यातील उत्साह टिकून राहतो असे स्वेरीच्या योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे यांचे प्रतिपादन**

# व्यायामात सातत्य आवश्यक : योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर :'सध्या केवळ योग दिन किंवा प्रशिक्षण सुरू असताना,आजार झाल्यानंतर व कार्यशाळा असेपर्यंत व्यायाम केला जातो. परंतु सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मनाच्या शांतीसाठी नियमित व्यायाम करण्याची आवश्यकता आहे. व्यायाम केल्यामुळे आपले आरोग्य आणि मन प्रसन्न राहते. करत असलेल्या कार्यात सकारात्मकता निर्माण होते,उत्साह वाढतो. म्हणून योगा, प्राणायम, व्यायाम करण्यात सातत्य हवे. यामुळे आपल्यातील उत्साह टिकून राहतो.' असे प्रतिपादन स्वेरीच्या योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे यांनी केले.

प्रत्येक वर्षी दि.२१ जून रोजी'जागतिक योग दिन'हा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात साजरा केला जातो. दि.२१ जून रोजी स्वेरीत मुख्य'जागतिक योग दिन'साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी यापुढेही'स्वेरी अंतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दि.२१ तारखेला सामुहिक'योग दिन'साजरा करण्याचे घोषित केले होते. तेंव्हापासून प्रत्येक महिन्याच्या दि. २१ तारखेला न चुकता स्वेरीत'योग दिन'घेतला जातो. मंगळवार,दि. २१ जानेवारी २०२५ हा स्वेरीमध्ये'सातवा योग दिन'साजरा करण्यात आला. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या,तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु आहे. परंतु स्वेरी च्या'योगा डे'मध्ये खंड न पाडता डिप्लोमाच्या व वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी प्रचंड प्रतिसाद दिला. विठ्ठलाचे अभंग आणि गणेश वंदनेने या'योगा डे'ची सुरवात झाली. पुढे स्वेरीच्या योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे यांनी विद्यार्थी,विद्यार्थिनी,

प्राध्यापक यांच्याकडून पुढे तासभर विविध प्राणायम करवून घेतले. विविध आसने,भस्रीका प्राणायम तसेच श्वास,फुफ्से, सांधे, पोटाचे, अवयवांचे विविध प्रकार करून घेतले. या योग सरावानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर अधिक उत्साह दिसून येत होता. मार्गदर्शन करताना प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे पुढे म्हणाल्या की, 'नियमित व्यायाम आणि योग्य आहार घेतल्यास मनात सकारात्मक विचार येवून मन प्रसन्न राहते. म्हणून प्राणायम,योगा नियमित करण्याची गरज आहे. यामुळे मनाची एकाग्रता वाढते.'असे सांगून'योगा'चे होणारे फायदे सांगितले. वसतिगृहातील विद्यार्थिनी मयुरी चौगुले म्हणाल्या की, 'पूर्वी मी उशिरा उठायचे,स्वेरीत आल्यावर प्राणायम करण्याचे मनावर घेतले. आता मी नियमित लवकर उठते. करत असलेल्या प्राणायमामुळे मनात सकारात्मकता येते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्राणायम करणे गरजेचे आहे याची खात्री पटते.'असे सांगून स्वेरीने उपलब्ध करून दिलेल्या या व्यासपीठाचे आभार मानले. सदरचा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली,स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने,इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, वसतिगृह व्यवस्थापक डॉ. के.बी. पाटील, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग,इंजिनिअरींग व फार्मसीच्या विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रा. रजनी पटेल यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

**वसतिगृहात होतोय दररोज योगा क्लास- स्वेरी अंतर्गत असलेल्या विद्यार्थिनींच्या वसतिगृहात विद्यार्थीनींच्याच मागणीनुसार दररोज पहाटे ५ ते ६ या वेळेत विद्यार्थिनीकडून योगा करवून घेतला जातो. स्वेरीच्या योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे ह्या विविध प्राणायम करून घेतात. यात जवळपास १७५ ते २०० विद्यार्थिनी नियमित प्राणायम करतात. प्राणायम केल्यामुळे विद्यार्थिनी अधिक उत्साही दिसत आहेत.**



## थोडक्यात...




### देवदर्शनासाठी गेल्यावर चोरट्याने दागिन्यांसह रक्कम पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : घरातील कुटुंब पंढरपुर येथे देवदर्शनासाठी गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराच्या मागील बाथरूम च्या खिडकीचे लोखंडी गज काढून खिडकी तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटा मधील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २ लाख १५ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना २० जानेवारी रोजी डी/६/२५६ गाळा,रविवार पेठ) येथे घडली. याप्रकरणी संतोष अंबादास येरल (वय-३१,रा.डी/६/२५६ गाळा, रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवणे हे करीत आहेत.

# उद्योगास चालना, शिक्षणात आमूलाग्र बदल, यासाठी दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक बैठक प्रेरणादायी

## अंकिता पाटील ठाकरे यांचे मत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर : स्वित्झर्लंड येथील दावोस येथे सुरू असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीसाठी एस. बी पाटील शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे यांनी उपस्थिती लावली आहे. या परिषदेसाठी त्यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीला सुरुवात झाली होत आहे. या परिषदेस राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, निहार ठाकरे देखील उपस्थित आहेत.

यावेळी अंकिता पाटील ठाकरे म्हणाल्या, या परिषदेत जागतिक व्यापार, व्यवसाय, राजकारण, शिक्षण आणि इतर क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणून जगाच्या आणि एखाद्या प्रदेशाच्या विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने चर्चा झाली.

**यावेळी त्यांनी आपल्या देशातील उद्योग, शिक्षण, आदी विषयांवर मतं मांडले. या परिषदेसाठी मला निमंत्रित करण्यात आले, ही एक मोठी जबाबदारी असून आपल्या देशाच्या वतीने याठिकाणी महत्वाचे प्रश्न मांडले. या परिषदेच्या माध्यमातून आपल्या देशात गुंतवणूक वाढावी, तसेच शिक्षण, व्यापार आदी क्षेत्रात अजून सुधारणा व्हावी, यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.**



या परिषदेत पहिल्याच दिवशी (२१ जानेवारी) महाराष्ट्राने मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या उपस्थितीत ६,२५,४५७ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार करण्यात आले आहेत. एकाच दिवशी इतक्या मोठ्या रकमेचे करार होणे, हा एक नवा विक्रम आहे.

# भाग्यश्री बागड यांना 'राष्ट्रीय साहित्यसेवा भूषण' पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



नाशिक / प्रतिनिधी : साहित्यकणा फाउंडेशन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय साहित्यकणा संमेलन ९ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे, यावेळी वलसाड, गुजरात येथील प्रसिद्ध लेखिका भाग्यश्री बागड यांना राष्ट्रीय साहित्यसेवा भूषण पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

या पुरस्कार वितरण समारंभासाठी प्रा. डॉ. नरेंद्र पाठक, अकादमी सदस्य, अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. समारंभ दुपारी ३ वाजता सुरू होईल आणि साहित्य क्षेत्रातील विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

भाग्यश्री बागड यांची लेखनशक्ती, समाजाभिमुख दृष्टिकोन आणि साहित्य क्षेत्रातील प्रदीर्घ योगदान यांमुळे त्यांच्याकार्याची दखल घेऊन हा प्रतिष्ठित पुरस्कार जाहिर झाला आहे. त्यांच्या काव्य, कथा आणि लेखनातील गोडवा व विचारशक्तीला मोठा आदर मिळालेला आहे.

हा पुरस्कार साहित्य क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचा समजला जातो आणि त्याच्या माध्यमातून साहित्यकणा फाउंडेशन समाजाला प्रेरणा देण्याचे कार्य करत आहे. साहित्यप्रेमी आणि लेखकांना या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचा भाग होण्याची संधी मिळेल. हा साहित्य समारंभ साहित्यकमींसाठी नवा आदर्श ठरेल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. तर विविध क्षेत्रातून भाग्यश्री बागड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लातुर जिल्हाधिकारी कार्यालय येथे युवा भिम सेनेचे धरणे आंदोलन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**




लातुर : लातुर जिल्हातील, अवैद्यारित्या व बेकायदेशीर चालु असलेले धंदे तात्काळ बंद करण्यात यावे.

लातुर शहरातील आर.टी.ओ.याचा मनमानी कारभारच्या विरोधात लक्षवेधी धरणे आंदोलनास सुरुवात झाली आहे.

लातुर जिल्हातील प्रशासनानी तात्काळ युवा भिम सेनेच्या लक्षवेधी आंदोलनाची दखल घ्यावी अन्यथा युवा भिम सेनेच्या वतीने लातुरच नव्हे तर सबंध महाराष्ट्रात यांचा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही. यांची दखल लातुर जिल्हातील प्रशासनानी घ्यावी.

यावेळी आंदोलनकर्ते युवा भिम सेना मराठवाडा अध्यक्ष कुणालभैय्या इंगळे, जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे महिला जिल्हाध्यक्ष उमाताई आदमाने, शहर जिल्हाध्यक्ष मनोज कदम यांचासह शेकडो कार्यकर्त उपस्थित होते.

– कुणालभैय्या इंगळे
मराठवाडा अध्यक्ष, युवा भिम सेना

# दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे महिला भगिनींसाठी चिखली घरकुल येथे आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे महिला भगिनींसाठी चिखली घरकुल येथे भव्य आरोग्य शिबिर हळदीकुंकू समारंभ आणि वृक्षारोपण समारंभ घेण्यात आला यावेळी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री अभय भोर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची शुभारंभ करण्यात आला यावेळी दुर्गा ब्रिगेड शहर उपाध्यक्ष सौ राहाहिता ताई पठाण यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तसेच दुर्गा ब्रिगेडची संस्थापक अध्यक्ष कुमारी दुर्गा भोर यांच्या हस्ते पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे चिखली पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस हवालदार दीपमाला लोकरे सह पोलीस फौजदार दिनेश ढवळे.

**हळदीकुंकू समारंभ संपन्न**

दामिनी पथक महिला पोलीस हवालदार सुजाता शिंदे, महिला पोलीस अंमलदार अश्विनी सोनवणे, क्राईम ब्रँच अधिकारी वरिष्ठ पद्मा समाचार चे संपादक पत्रकार श्री नाना कांबळे संपादक पावना समाचार महाराष्ट्र पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे, रोजी भानुषाली, सीएम को उद्योजक रेवणा शिंदे, श्री स्वप्निल माने, यासीन सय्यद, अर्चना भेगडे, भाई विशाल जाधव इत्यादी मान्यवर उपस्थित होते यावेळी आरोग्य शिबिरात विविध रोगावर तपासण्या करण्यात आल्या व स्त्रियांचे सर्व विकार व विविध चिकित्सा करण्यात आल्या तसेच परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण समारंभ पार पाडात यावेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले तसेच याप्रसंगी दुर्गाप्रिकारी ते महिला भगिनी उपस्थित होत्या रिजवान शेख वैभवी आरोळे रूपाली निकम मालका निकम अशा सरोदे आर्थिक गोखले रंजनाताई महानोर अशा कोळपे माहिती शाकीर शेख खदीर पठाण राजेंद्र गायताळे नितीन आराेळी इजरायल शेख अशपाल सरोदे आरोग्य शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित महिला उपस्थित होत्या.




# डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम प्रज्ञाशोध परीक्षेत वाजे विद्यालयाचे घवघवीत यश

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- निफाड तालुका एज्युकेशन सोसायटी तर्फे आयोजित डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम प्रज्ञाशोध परीक्षा स्पर्धेमध्ये लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालय,सिन्नर या विद्यालयातील कार्तिक भरत शिंदे याने द्वितीय क्रमांक मिळवून वाजे विद्यालयाच्या नावलौकिकात भर टाकली आहे.




कै.बी.पी.पाटील व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स पिंपळगाव बसवंत या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थी सहभागी झालेले होते.

कै. बी.पी.पाटील ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स पिंपळगाव बसवंत कॉलेजचे प्राचार्य प्रकाश भंडारे, प्राध्यापिका मीनाक्षी जाधव, प्रा. कुमावत , प्रा. दिंडे , प्राध्यापिका लोखंडे मॅडम यांनी स्वतः विद्यालयांमध्ये येऊन त्या विद्यार्थ्याचे व त्याचे वडील भरत शिंदे यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते गुलाब पुष्प ,३१००० (एकतीस हजार) रुपये रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थी व देणगीदारांचे संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांनी कौतुक केले आहे .

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांनी आलेल्या पाहुण्यांच्या कार्याचा गुणगौरव केला. तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा यासारख्या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा व यश संपादन करावे असे सांगितले.

तसेच विद्यालयाचा माजी विद्यार्थी महेश शंकर पवार यांनी त्यांचे वडील कै.शंकर रामचंद्र पवार यांच्या स्मरणार्थ ११००० (अकरा हजार) रुपये विद्यालयास ठेव स्वरूपात देणगी दिली . या रक्कमेच्या व्याजातून इयत्ता दहावी परीक्षेत उत्तीर्ण झालेले प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना ही रक्कम रोख स्वरूपात देण्यात यावी असे सांगितले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक राम ढोली, सर्व ज्येष्ठ शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते सूत्रसंचालन जितेंद्र शिंदे यांनी केले . पर्यवेक्षक राम ढोली यांनी उपस्थितांचे आभार मानले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्था व विद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करीत असते. कार्तिक शिंदे यांनी मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे. यापुढे त्याला असेच सुयश मिळू अशी सदिच्छा, सिन्नर तालुका संचालक मराठा विद्या प्रसारक समाज संस्था नाशिकचे कृष्णाजी भगत म्हणाले.



# जि. प. प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे यांची जिल्हास्तरीय खो खो स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : निफाड तालुक्याच्या जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा सरस्वती विद्यालय निफाड येथे पार पडल्या असून सदर स्पर्धांचे उद्घाटन निफाड तालुक्याचे आ. दिलीप बनकर यांच्या हस्ते करण्यात आले. निफाड तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सौ. लता भारसट तसेच शिक्षण विस्तार अधिकारी कैलास बोरसे व गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण स्पर्धा पार पडल्या. या तालुकास्तरीय अध्यक्ष चषक स्पर्धा मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे यांनी सहभाग नोंदवून तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा मध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तसेच समूह नृत्य या प्रकारामध्ये तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच वीरा ज्ञानेश्वर महाजन या विद्यार्थिनीची जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेसाठी निवड झाली. खो-खो चा अंतिम सामना जिल्हा परिषद शाळा पिंपळस रामाचे(सायखेडा बिट) व जिल्हा परिषद शाळा कारसूळ( पिंपळगाव बिट) यांच्यात होऊन पिंपळस रामाचे या संघाने उत्कृष्ट खेळ करत संघाला विजयश्री मिळून दिला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे या संघाची जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने, पिंपळस रामाचे सरपंच, उपसरपंच एसएमसी अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**ॲड. शिल्पा सुरवसे ह्या निष्ठावंत व प्रामाणिक वकील म्हणून काम पाहिले**

**ॲड. शिल्पा सुरवसे यांनी नळदुर्ग शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला**

# ॲड. शिल्पा सुरवसे-बनसोडे ह्या सोलापूर येथे सरकारी वकील म्हणून पदभार स्वीकारला

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : धाराशिव जिल्ह्याच्या नळदुर्ग शहरातील शिल्पा सुदर्शन सुरवसे ह्या नळदुर्ग शहरातील रहीवाशी आसुन त्यांचे सासर शिल्पा सुमित बनसोडे ह्या नावाने ओळखले जाते परंतू त्यांनी १० ते १२ वर्ष उमरगा न्यायालयात निष्ठावंत व प्रामाणिक वकील म्हणून काम पाहिले आहे २०२१ २०२२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत यश मिळाले आहे यादी प्रसिद्ध होताच ड शिल्पा सुरवसे - बनसोडे यांनी सोलापूर शहर सत्र न्यायालयात सहाय्यक सरकारी अभियोक्ता सरकारी वकील तात्काळ त्यांनी पदभार स्वीकारला या निवडीमुळे नळदुर्ग व आचलेर गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे त्यामुळे सोलापूर येथे जी एम मागासवर्गीय बहुउदेशिय संस्थे मार्फत संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे यांनी भारतीय संविधानाचा ग्रंथ देऊन सत्कार केला.

**सर्वत्र अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव**

यावेळी डॉ सतीश खारवे सह कार्यकर्ते उपस्थित होते . डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रभावीत झालेल्या महाराष्ट्रातील सर्व यूवक यूतीनी एम पी एस सी, यू पी एस सी मार्फत आपले शिक्षण घ्यावे आपण एखदा अधिकारी झोलोत की सर्व सामान्य माणूस म्हणून जगण्याचा हक्क आपणाला मिळणार आहे त्यांना न्याय देण्याचे काम आपण करणार आहेत त्यामुळे सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आसल्याचे मत वृत्तपत्राशी बोलताना ॲड. शिल्पा सुरवसे बनसोडे यांनी व्यक्त केले .या निवडी मुळे सर्वत्र अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# चोरट्याने पळविली सिगारेट पाकिटे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : मार्केट यार्ड येथील यश ट्रेडर्स या दुकानाचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश करीत वेगवेगळ्या कंपनीची सिगारेट पाकीट व साहित्य असा २९ हजार पाचशे रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना १६ जानेवारी रोजी घडली.याप्रकरणी यश गिरिधारी निरंकारी (वय-२४,रा.गुरुनानक नगर,ब्लॉक नंबर ७) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.